नवकार जाप, रुग्णाना फळ वाटप करुन महावीर जयंती कार्यक्रमला सुरुवात >>पान 2

अतिक्रमण हटाव मोहिमेत बेरोजगारांच्या व्यवसायाचे रक्षण करावे >>पान 3

सर्वसामान्यच नव्हे तर चक्क आमदार, केंद्रीय मंत्र्यांची सुद्धा अधिकाऱ्यांकडून दिशाभूल >>पान 4

**सुविचार**

चुकांमधून शिकणे हेच यशाचे रहस्य आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 237 ■ गुरूवार, दि. 10 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'त्या' सीनसाठी अभिनेत्री माधुरी दिक्षीतने घेतले तब्बल एक कोटी रुपये

आतील पान

# आधार कार्ड सोबत बाळगण्याचं टेन्शन मिटलं

**नवी दिल्ली : यूआयडीएआयकडून जारी करण्यात आलेलं आधार कार्ड आता महत्त्वाच्या कागदपत्रांपैकी एक आहे. आधार कार्डचा वापर करणं सोपं व्हावं आणि आधार कार्डचा वापर वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न करण्यात येत आहे. आधार कार्ड संदर्भात नवं फीचर लाँच करणयात आलं आहे. हे आधारच्या डिजिटलायझेशनं संदर्भातील महत्त्वाचं पाऊल आहे. केंद्रीय मंत्री माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या संदर्भातील माहिती दिली. फेस आयडी ऑथेटिकेशन फीचरसह यूआयडीएआयनं ॲप लाँच केलं आहे.**

## नवं ॲप येणार, केंद्रीय मंत्र्यांची मोठी घोषणा

नव्यानं लाँच करण्यात येणाऱ्या आधारच्या ॲपसह एअरपोर्ट आणि हॉटेलमध्ये चेक न करताना आधार कार्डच्या सॉफ्ट कॉपी किंवा हार्ड कॉपी द्यावी लागणार नाही. यूआयडीएआयनं नवं ॲप विकसित केलं आहे. सध्या लाँच करणयात आलेलं ॲप बेटा स्वरुपाचं असून तपासणीच्या टप्प्यात आहे. याची चाचणी यशस्वी झाल्यास ते सर्वांसाठी लाँच कलं जाईल.

आधार कार्डची गरज पडल्यास क्यूआर कोड आणि फेस आयडीच्या द्वारे पडताळणी केली जाईल. या ॲपमुळं फेस आयडी ऑथेंटिकेशनला डिजिटल पडताळणीला प्रोत्साहन मिळेल. याच्या सुरक्षा आणि गोपनीयतेसाठी आर्टिफिशअल इंटेलिजन्सची मदत घेतली जात आहे.

नव्या आधार कार्ड ॲपमध्ये गोपनीयतेला प्राधान्य दिलं जाणार आहे. यामुळं वैयक्तिक माहितीचं नियंत्रण यूजरच्या हातात असेल. डेटा शेअरिंगसाठी यूजर्सची मान्यता अपेक्षित असेल, त्यामुळं गोपनीयता कायम राहील.

फेस आयडी ऑथेंटिकेशन मुळं आता फक्त चेहऱ्याच्या आधारे आधार पडताळणी केली जाईल. यामुळं यूपीआय पेमेंट प्रक्रिया सोपी होईल. यूआयडीएआयच्या दाव्यानुसार ॲप १०० टक्के डिजीटल आणि सुरक्षित असल्यानं यामध्ये डेटा सोबत छेडछा करता येणार नाही. यामुळं डेटा लीक होणार नाही, याचा दुरुपयोग होणार नाही. डिजिटल इंडिया कार्यक्रमानुसार हे ॲप पेपरलेस गव्हर्नंसला प्रोत्साह मिळेल. ज्यामुळं आधार कार्डशी संबंधित कामं डिजिटली पूर्ण होतील.

## साईंच्या झोळीत भाविकांनी केले भरभरुन दान; मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ५० लाखांनी वाढ

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** साईबाबा संस्थानच्या वतीने शिर्डीत साजरा करण्यात आलेल्या तीन दिवसीय राम नवमी उत्सवात भाविकांना भरभरून दान केलंय. तीन दिवसांत तब्बल ४ कोटी २६ लाख रुपये भाविकांनी साई चरणी अर्पण केलेत. तर अडीच लाखांहून अधिक भाविकांनी साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतलंय. मागील वर्षाच्या तुलनेत यंदाच्या वर्षी तब्बल ५० लाखांनी साईंच्या दानात वाढ झालीय. शिर्डी साईबाबा संस्थानच्या वतीनं यंदाच्या वर्षी ११४ वा श्रीराम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आलाय.

## बॉलिवूडमधील प्रसिद्ध निर्माते सलीम अख्तर यांचं निधन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमधील प्रसिद्ध निर्माते सलीम अख्तर यांचं मंगळवारी (दि. ८) निधन झालं आहे. मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलमध्ये सलीम यांची प्राणज्योत मालवली.सलीम यांचं निधन कशाम ुळे झालं, याविषयी कोणतंही कारण अद्याप कळू शकलं नाही. सलीम यांच्या निधनाने बॉलिवूड कलाकार आणि चाहते शोक व्यक्त करत आहेत. बॉलिवूडमधील अनेक कलाकारांनी सलीम यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

## अमेरिकेच्या व्यापार कराबाबत संजय मल्होत्रा काय म्हणाले?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर आयात शुल्क लादले आहे. कमीतकमी १० टक्क्यांपासून हे आयात शुल्क असून प्रत्येक देशासाठी विविध कर लादण्यात आले आहे. यामुळे अनेक देशातील अनेक कंपन्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून जगात व्यापार युद्धाची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, ही संभाव्य परिस्थिती टाळण्याकरता भारत अमेरिकन प्रशासनाशी संवाद साधत असल्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. चलनविषय धोरण समितीने घेतलेल्या निर्णयांची घोषणा करताना ते बोलत होते.

## उजनी धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु; पंढरपूर, मंगळवेढा अन् सांगोल्यासाठी खुशखबर

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** गेल्यावर्षी पावसाळ्यात उजनी धरण १००м भरूनही जिल्ह्यातील पाण्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट बनू लागली आहे. आज सोलापूर महापालिकेसह पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला या नगरपालिकांसाठी उजनी धरणातून सहा हजार क्युसेक निसर्गाने पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांना सावधानतेचा इशारा प्रशासनाच्या वतीने दिला आहे. सध्या सोलापूर शहरासह सर्वच नगरपालिकांमध्ये पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात त्यांचाही असल्याने भीमा नदीत हे पाणी सोडण्यात आलेले आहे.



### धास्तावलेल्या गुंतवणूकदारांना

# रिझर्व्ह बँकेचा दिलासा

## रेपो रेट घटवून ६ टक्क्यांवर आणला



**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हट्टाला पेटत सुरु केलेल्या रेसिप्रोकल टॅरिफच्या आक्रमक अंमलबजावणीमुळे भारतीय शेअर बाजारात हाहा:कार उडालेला असताना रिझर्व्ह बँकेकडून एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरण समितीच्या बुधवारी झालेल्या बैठकीत रेपो रेटमध्ये कपात करण्यात आली आहे. रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंटची कपात करण्यात आल्याने आता रेपो रेट हा ६ टक्क्यांवर आला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी याबाबतची घोषणा केली. फेब्रुवारी महिन्यात महागाई दर ३.६१ टक्क्यांवर घसरला आहे. तर हाच दर जानेवारी महिन्यात ४.२६ टक्के इतका होता. त्यामुळे रेपो रेटमध्ये कपात होईल, अशी अपेक्षा होती. ही अपेक्षा खरी ठरल्याने सामन्य गुंतवणुकदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयामुळे आगामी काळात बँकांकडून गृह कर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज आणि >>पान २

### बाबा सिद्दीकी प्रकरणातील मास्टरमाइंड

## झिशान पोलिसांच्या ताब्यात!



**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी आमदार बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबईतील वांद्रे येथील खेरवाडी सिग्नल येथे हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई गँगला आरोपी ठेवण्यात आले असून मुंबई गुन्हे शाखेने एकूण २६ जणांना अटक केली होती. परंतु कट रचणाऱ्या मुख्य सूत्रधारांना जेरबंद करण्यात यश येत नव्हते. मात्र आता या हत्येप्रकरणातील मास्टरमाईंडला पंजाब पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात पोलिसांनी गोळीबार करणाऱ्यांना अटक करुन त्यांची चौकशी केली होती. तेव्हा मुख्य कट रचणाऱ्या शुभम लोणकर, झीशान अख्तर आणि अनमोल बिश्नोई यांची नावे समोर आली. यामधील झीशान अख्तर फरार झाला असून मंगळवारी पंजाबमधील भाजप नेत्याच्या घरी ब्लास्ट केल्याच्या प्रकरणात झिशान अख्तरसह त्याच्या गँगमधील दोन जणांना पंजाब पोलिसांनी अटक केली आहे.

पंजाब भाजपाचे माजी अध्यक्ष मनोरंजन कालिया यांच्या जालंधर येथील घरावर ग्रेनेड हल्ला करण्यात आला. या स्फोटात कोणीही जखमी झाले नाही, परंतु घराच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या आणि कार-दुचाकींचे नुकसान झाले.

पोलिसांनी या घटनेलसाठी पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय आणि लॉरेन्स बिश्नोई टोळीने जबाबदार ठरवले.

कोण आहे झिशान अख्तर?

झीशान हा जालंधरमधील नकोदर येथील शंकर गावचा रहिवासी आहे. टार्गेट किलिंग, खून, दरोडा अशा ९ गुन्ह्यांम ध्ये तो वॉन्टेड आहे. ७ जून २०२४ रोजी जीशान तुरुंगातून बाहेर आला. तुरुंगातच त्याची लॉरेन्स गँगचा मुख्य गुंड आणि शूटर विक्रम ब्रारशी भेट झाली. त्याच्या माध्यमातून तो लॉरेन्स गँगशी जोडला गेला. गँगस्टर लॉरेन्सच्या सूचनेनंतर झीशानने बाबा सिद्दिकीची हत्या केली. वडिलांच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी झिशान गुन्हेगार बनला. पंजाब पोलिसांनी केलेल्या चौकशीत त्याने ही कबुली दिली होती.

# समता पंधरवाडात विविध उपक्रमाचे आयोजन; सहभागी होण्याचे आवाहन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात समता पंधरवडा राबविण्यात येत आहे. या पंधरवाडाचा मंगळवार दि. ८ एप्रिल रोजी समाजकल्याण कार्यालय येथील सामाजिक न्याय भवनात सामाजिक समता सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. पंधरवाडा कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार असून या उपक्रमात सर्वांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण यांनी केले.

डॉ. अनिता राठोड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक जीवन व त्यांचे कार्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सामाजिक जीवनमान उंचावयाचे असेल तर प्रत्येकाने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजुन घेतले पाहिजे. हेच विचार आपल्याला सामाजिक जीवनात तारु शकतात. जिवनात बदल घडवु शकतात, असे प्रतिपादन डॉ. राठोड यांनी केले.

सामाजिक सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार असून यामध्ये शाळा, महाविद्यालय स्तरावर प्रबोधन, मार्गदर्शन, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य, मनी मार्जीन योजनेअंतर्गत कार्यशाळा, मुलभुत अधिकार, कर्तव्ये या विषयी व्याख्याने, महीला मेळावा, जेष्ठांना मार्गदर्शन, आरोग्य शिबीर, रक्तदान, संविधान जनजागृती, सच्छता अभियान, कर्मविर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा, गटई योजना अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यामातुन सामाजिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयन्त सप्ताहाच्या माध्यामातुन होणार आहे. या कार्यक्रमात सर्वानी सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण यांनी केले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन संदीप कपले यांनी केले. त्यानंतर आश्विन हिवाळे यांनी प्रास्ताविकातून सप्ताहात कोणाकोणते उपक्रम राबविण्यात येणार आहे, याची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी सर्व आर्थिक विकास महामंडळाचे कर्मचारी, वसतीगृहाचे विद्यार्थी, बार्टीचे समतादुत, तालुका समन्वय, सर्व कर्मचारी, स्वछतादुत, सुरक्षारक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. प्रमोद खनवे यांनी केले.

# प्रतीक्षा संपली! अमरावतीतून थेट विमानाने मुंबईवारी, या दिवशी पहिलं टेक ऑफ

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** गेल्या काही काळापासून असणारी अमरावती ते म ुंबई ही विमानसेवेची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. अमरावतीहून मुंबईसाठी १६ एप्रिल रोजी पहिलं हवाई उड्डाण होणार आहे. सकाळी ११.३० वाजता पहिलं प्रवासी विमान झेपावणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे यांच्या हस्ते विमानतळाचे लोकार्पण होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, महसूलमंत्री तथा अम रावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मंत्री, आमदार आणि खासदार उपस्थित असणार आहेत.

नुकतीच एटीआर-७२ चाचणी





नुकतेच अमरावती विमानतळाची एटीआर-७२ विमान चाचणी यशस्वी झाली. त्यासाठी इंदूर येथून विशेष विमान आले होते. त्यानंतर अमरावतीचे विमानतळ प्रवासी वाहतुकीसाठी सुसज्ज असण्यावर शिक्कामोर्तब झालं.

## मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवा

अमरावती विमानतळावरून प्रादेशिक संपर्क योजना उडानअंतर्गत व्यावसायिक विमानसेवा सुरू होत आहे. आठवड्यातून ३ दिवस अमरावतीकरांना विमानाने मुंबईवारी करता येईल. याबाबत अलायन्स एअर लाइन्सने वेळापत्रक जारी केले आहे. दरम्यान, अमरावती विमानतळावर अत्याधुनिक पायाभूत सुविधा, नेव्हिगेशन प्रणाली आणि ग्राउंड हैंडलिंगची चाचणी झाली आहे. आता मुंबई-अमरावती-म ुंबई अशी विमानसेवा सुरू होणार आहे.

सोमवारी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि अलाइन्स एअर लाइनच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली. यात अमरावती विमानतळाचे लोकार्पण आणि विमानसेवा सुरु करण्यासाठी विचारमंथन झाले.

शुभारंभाचे वेळापत्रक जारी

अलायन्स एअर लाइन्सकडून मुंबई-अमरावती-मुंबई विमानाच्या शुभारंभाचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. याबाबत अमरावतीकरांम ध्ये कमालीची उत्सुकता आहे. १६ एप्रिल रोजी पहिल्या विमानाने प्रवास करण्यासाठी काही जणांनी अलायन्स एअरलाइन्सच्या संकेतस्थळाहून बुकिंग देखील केलं आहे.

## अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकार अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग, संयम, प्रेम, करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

## 'त्या' सीनसाठी अभिनेत्री माधुरी दिक्षीतने घेतले तब्बल एक कोटी रुपये

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमध्ये आपल्या सौंदर्याने आणि दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणारी 'धक धक गर्ल' माधुरी दीक्षित आजही तितकीच लोकप्रिय आहे. ८०-९० च्या दशकात बॉक्स ऑफिसवर एकहाती वर्चस्व गाजवणाऱ्या माधुरीने एका चित्रपटातील बोल्ड सीनसाठी तब्बल एक कोटी रुपये घेतल्याची माहिती आता समोर आली आहे.

एकाच सीनसाठी घेतला कोटी रुपये मानधन

माधुरी दीक्षितने तिच्या फिल्मी करिअरमध्ये अनेक सुपरहिट चित्रपट दिले. मात्र 'दयावान' या चित्रपटात तिने घेतलेल्या एका निर्णयामुळे ती चर्चेत आली. या चित्रपटात माधुरीने अभिनेता विनोद खन्ना यांच्यासोबत काही इंटीमेट सीन केले होते. त्या काळात या प्रकारच्या दृश्यांवर प्रेक्षक तीव्र प्रतिक्रिया देत असत. विशेष म्हणजे यातील एका सीनसाठी माधुरीने एक कोटी रुपये मानधन घेतल्याचं सांगितलं जातं.

त्या काळात केवळ एका सीनसाठी इतका मोठा मोबदला घेणं ही अभूतपूर्व गोष्ट मानली जात होती. 'दयावान' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर विनोद खन्ना आणि माधुरी दीक्षित यांचा किसिंग सीन विशेष चर्चेचा विषय ठरला होता. या दृश्यामुळे बॉलीवूडमध्ये मोठी खळबळ उडाली होती आणि माधुरीच्या भूमिकेवर अनेकांनी टीका केली होती.

सिनेमातील दृश्यांवरून निर्माण झाला वाद

'दयावान' प्रदर्शित झाल्यानंतर या चित्रपटातील बोल्ड सीन्समुळे प्रेक्षकांमध्ये आणि इंडस्ट्रीत संतापाची लाट उसळली. माधुरी दीक्षितवर सामाजिक माध्यमांपासून ते माध्यमांपर्यंत सर्वत्र टीका झाली. या सीनमुळे दिग्दर्शक फिरोज खान यांनाही मोठ्या वादाला सामोरे जावं लागलं. टीकेच्या पार्श्वभूमीवर काही संघटनांनी त्यांना हे सीन हटवण्याची नोटीस पाठवली होती.

मात्र, फिरोज खान यांनी कोणत्याही मागणीकडे लक्ष दिलं नाही. त्यांनी आपल्या कलात्मक स्वातंत्र्याचा वापर करत चित्रपटातील एकही सीन कापला नाही. त्यामुळे हा सीन चित्रपटात कायम राहिला आणि तो आजही बॉलीवूडमधील एक वादग्रस्त सीन म्हणून ओळखला जातो. माधुरीसाठी हा अनुभव एक वेगळा वळण ठरला होता.

# नवकार जाप, रुग्णाना फळ वाटप करुन महावीर जयंती कार्यक्रमला सुरुवात






दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार : जैन समुदायासाठी महावीर जयंती अत्यंत महत्त्वाची असते. हा दिवस ते जैन धर्माचे महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करतात. ते शुक्ल पक्षामध्ये चैत्र महिन्याच्या तेराव्या दिवशी जन्मले होते. जैन धर्मातील महान तीर्थंकराचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती साजरी केली जाते. ते जैन धर्माचा प्रचार करणारे शिक्षक म्हणून ओळखले जातात. जगाला जिओ और जिने दोचा संदेश देणाऱ्या भगवान महावीर यांची जयंती हा दिवस १० एप्रिल २०२५ रोजी साजरा केला जाणार आहे.**

जैन धर्मात अहिंसा ला फार महत्व आहे,रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे असे प्रतिपादन यावेळी लोणार तहसील च्या नायब तहसीलदार परीलकर मैडम यांनी केले लोणार शहरात महावीर जयंती निमित्त जैन समाजकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन करन्यात आलेले आहे त्याचाच भाग म्हणून जैन सहेली सोशल ग्रुप कडुन ग्रामीण रुणालय येथे रुग्णना फल व बिस्किट वाटप केले या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिति म्हणून लोणार तहसील च्या नायब तहसीलदार परीलकर मैडम, डॉक्टर कविता मापारी मैडम, डॉक्टर नागरे मैडम,डॉक्टर



निखिल अग्रवाल, प्रेम सिंघी,सतीश गेलडा,प्रमोद राका होते, नुकतेच जैन सहेली सोशल ग्रुप ने गौरक्षनात जाऊंन गौ माता ची सेवा करून गुडिपाडवा साजरा केला,जैन सहेली सोशल ग्रुप चा मुख्य हेतु समाजउपयोगी कार्य करने, जनसेवा करने आहे यावेली रुणालय ला एक पाण्यसाठी माठ सहेली ग्रुप कडून भेट स्वरूप दैन्यात येइल असे सांगन्यात आले, यावेली बहुसंख्य हॉस्पिटल कर्मचारी वर्ग उपस्थित होता कार्यक्रम यशस्वी साठी जैन सहेली सोशल ग्रुप च्या श्वेता सिंगी, स्मिता राका, नंदा संचेती, प्रिया लुनिया, प्रीती संचेती प्रज्ञा राका, सारिका रेदासनी, पुनम रुणवाल, ममता गेलडा, श्रुती बोरा,, नूतन बेदमुथा, सपना गेलडा, शोभा राका, सीमा घेरवरा. यांनी परिश्रम घेतले

# 'रोगमुक्त रिसोड' आरोग्य शिबिर संपन्न

## संजीवनी ममता हॉस्पिटलचा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन यांच्या नेतृत्वाखाली, ५ व ६ एप्रिल रोजी 'रोगमुक्त रिसोड' हे मेगा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास रिसोड शहरातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

सदर शिबिरामध्ये एकूण ५६० रुग्णांची तपासणी करण्यात आली यामध्ये ३३२ पुरुष तर २२८ महिलांचा समावेश होता. शिबिरात संपूर्ण मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये हाडांचे विकार (ऑर्थोपेडिक्स), कर्करोग (ऑन्कोलॉजी) आणि डोळ्यांचे आजार (ऑफ्थाल्मॉलॉजी) या फाउंडेशनच्या मुख्य सेवा क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला.

शिबिरातील सर्व ५६० नागरिकांची बीपी, शुगर तपासणी करण्यात आली. हाडांच्या विकारांची तपासणी ज्या मध्ये गुडघा व कूल्हा सांधेदुखी असणाऱ्या एकूण ४८५ रुग्णांची तपासणी करण्यात आली



पैकी ७६ रुग्णांचे एक्स-रे करण्यात आले तर ६३ ऋणांवरती शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. ३८८ महिलांची कर्करोग तपासणी करण्यात आली ज्यामध्ये २२८ मॅन्युअल ब्रेस्ट तपासणी, ५४थर्मल मॅमोग्राफी, १४ पॅप स्मीयर चाचणी करण्यात आली. ३८८ डोळ्यांच्या रुग्णांची तपासणी करण्यात आली ज्यामध्ये ४७ रुग्णांवरती मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. शिबिरामध्ये तपासलेल्या सर्व लाभार्थ्यांना मोफत औषधे देण्यात आली, जेणेकरून त्यांचे पुढील उपचार सुरळीत पार पडतील.

शिबिर यशस्वी करण्यासाठी संजीवनी ममता हॉस्पिटल, मुंबई येथील डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ आणि सहाय्यक कर्मचारी यांनी अथक परिश्रम केले तसेच उत्तमचंद बगडिया महाविद्यालय कर्मचारी व विद्यार्थी, समता फाउंडेशनची कर्मचारी यांनी सहकार्य केले. ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन हे रिसोड व परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि रोगमुक्त समाज घडवण्यासाठी सतत उपक्रम राबवत राहणार असल्याचे प्रतिपादन मधुसूदनजी अग्रवाल यांनी केले.

## पंढरपूरला विठुरायांचे दर्शन घेऊन आले अन् गावाच्या हद्दीत शिरताच नवरा-बायकोवर गोळीबार

**सोलापूर/प्रतिनिधी :** पंढरपूरला विठुरायाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या पती-पत्नीवर गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चार वर्षापूर्वीच्या एका जुन्या वादातून हा गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात जखमी झालेल्या पत्नीची प्रकृती चिंताजनक आहे. मोहोळ तालुक्यातील रोपळे येवती मार्गावर गोळीबाराची घटना घडली. हल्ला करणारा हल्लेखोर फरार झाला असल्याची माहिती आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शिवाजी पुंडलिक जाधव आणि सुरेखा शिवाजी जाधव या पती-पत्नीवर पिस्तूल मधून गोळ्या झाडून ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिवाजी जाधव यांना एक गोळी तर सुरेखा जाधव यांना तीन गोळ्या लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दशरथ केरू गायकवाड असे गोळीबार करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. शिवाजी जाधव (६५) आणि सुरेखा जाधव (६०) यांच्यावर सध्या सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुरेखा जाधव यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

पान १ वरून...

## धास्तावलेल्या गुंतवणूकदारांना

इतर कर्जांच्या व्याजदरात कपात केली जाण्याची दाट शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेने सलग दुसऱ्यांदा रेपो रेट कमी केल्याने बँकाकडून कर्जांवरील व्याजदरात कपात करण्यासाठीचा दबाव वाढू शकतो. याचा फायदा गृहकर्ज आणि वाहन कर्जाचे हप्ते फेडणाऱ्या सामान्यांना होऊ शकतो. अमेरिकेच्या नव्या आयातशुल्क धोरणामुळे जगभरातील भांडवली बाजारांमध्ये खळबळ माजली आहे. सोमवारी भारतीय शेअर बाजारातही मोठी पडझड झाली होती. त्यादिवशी सेन्सेक्स तब्बल २३०० अंकांनी तर निफ्टी जवळपास ८०० अंकांनी गडगडला होता. या पार्श्र्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने रेपो रेट घटवल्याने भांडवली बाजारात त्याचे सकारात्मक पडसाद उमटू शकतात. सेन्सेक्स आणि निफ्टी आणखी वधारल्यास धास्तावलेल्या गुंतवणुकदारांना मोठा दिलासा मिळू शकतो.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार १ ऑक्टोबर २०१९ नंतर ज्यांनी फ्लोटिंग व्याजदरावर कर्ज घेतलं आहे त्यांना बाहेरच्या बेंचमार्कशी जोडणं गरजेचे आहे. त्यामुळे आरबीआयनं रेपो रेट घटवल्यास बँकांना देखील गृह कर्जावरील व्याज घटवावं लागू शकतं. जर आरबीआयनं रेपो रेटमध्ये कपात केली तर गृहकर्ज देखील स्वस्त होऊ शकतं. याचा फायदा नवं गृहकर्ज घेणाऱ्यांना आणि फ्लोटिंग इंटरेस्ट रेट असणाऱ्यांना फायदा होईल. जानेवारी ते एप्रिल दरम्यान अनेक सरकारी आणि खासगी बँकांनी त्यांच्या गृहकर्जात ५-२५ बेसिस पॉईंटची कपात केली आहे.

## माणिकराव कोकाटेंना मंत्रीमंडळातून काढून टाकलं पाहिजे, शेतकरी नेते राजू शेट्टींची टीका



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांबद्दल बेजबाबदार विधान करणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना राज्य मंत्रीमंडळातून काढून टाकलं पाहिजे, असं विधान स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केलंय. तसंच, शक्तीपीठ महामार्गासाठी जो अवास्तव खर्च दाखवलेला आहे, म्हणजे यामध्ये प्रचंड मोठा भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शक्तीपीठ महामार्ग म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण आहे. आम्ही तो होऊ देणार नाही, असा निर्धार राजू शेट्टी यांनी व्यक्त केलाय.

बुधवारी (दि.९) राजू शेट्टी हे नांदेडमध्ये पत्रकारांशी बोलत होते. यावेळी, ''कर्जमाफीचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या हातात पडत नसतात, ते बँकेत जातात. तरीही माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांचा अवमान केला आहे. त्यामुळं त्यांनी राजीनामा घ्यावा'', असं राजू शेट्टी म्हणाले. याशिवाय, ''बेजबाबदार कृषीमंत्री मी बघितला नाही. भिकारी सुद्धा १ रुपया घेत नाही, १ रुपयाला पीकविमा ही सरकारची हूल होती. कर्जमाफीवर बोलताना सुद्धा त्यांनी शेतकऱ्यांवर आरोप केले. नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक बुडाली. त्यात कोकाटे देखील एक आहेत. हे बुडवे आहेत आणि अक्कल पाजळत आहेत'', अशा शब्दांत राजू शेट्टी माणिकराव कोकाटे यांच्यावर टीका केलीय.

पाशवी बहुमत मिळवून सुद्धा प्रशासनावर पकड नाही : पुढं राजू शेट्टी म्हणाले की, ''शक्तीपीठ महामार्गासाठी जो अवास्तव खर्च दाखवलेला आहे, म्हणजे यामध्ये प्रचंड मोठा भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शक्तीपीठ मार्ग म्हणजे अर्थकारण आहे. ५५ हजार कोटींचा जादा खर्च दाखवला आहे. असा हा महायुतीचा कारभार आहे. कोणाचा पायपोस कोणाला नाही. पाशवी बहुमत मिळवून सुद्धा प्रशासनावर पकड ठेवता आली नाही'', असं म्हणत राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला. तसंच, शेतकरी आत्महत्या वाढत असल्याचंही राजू शेट्टी यांनी सांगितलं.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### समता पंधरवाडात विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्राचे वितरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात समता पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे विशेष मोहिमेंतर्गत ६७० विद्यार्थ्यांनाचे जात वैधता प्रमाणपत्राचे ऑनलाईन वितरण व ७५ त्रुटीची पुर्तता समता पंधरवडाच्या पहिल्या सप्ताहात करण्यात आले.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलडाणा कार्यालयातर्फे दि. १ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत ''समता पंधरवाडा'' विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. पंधरवाडाच्या पहिल्या सप्ताहात (दि. १ ते ७ एप्रिल २०२५) या कालावधीत राज्यातील ११ व १२ वी विज्ञान शाखेतील २०२५-२६ मधील सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच त्रुटीची पुर्तता करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेचे ई-मेल आलेले आहेत अशा ७५ अर्जदारांनी त्रुटीची पुर्तता करुन ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहे. तसेच विज्ञान शाखेतील २०२५-२६ मधील ११ व १२ वीच्या ६७० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले आहे.

जिल्ह्यातील ११ व १२ वीच्या विज्ञान शाखेतील व डिप्लोमाच्या तृतीय वर्षातील सन २०२५-२६ मधील प्रवेशीत सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी समिती कार्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य, माया केदार यांनी केले आहे.

### पाटील महाविद्यालयात सामाजिक समता सप्ताह निमित्त निबंध स्पर्धा





दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह'' निमित्त निबंध स्पर्धा घेण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहचे आयोजन करण्यात आले . प्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड यांनी याप्रसंगी बोलताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यावर आपले विचार व्यक्त केले. या निबंध स्पर्धेत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. प्रकाश हनवते यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. केशव कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. सिद्धार्थ इंगोले यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची अंतर योग फाउंडेशन ला सदिच्छा भेट

#### युवा पिढीने योगाचा अंगीकार करून शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपावे : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील



**मुंबई/प्रतिनिधी :** आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आणि वाढलेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी, शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्य जपणे महत्वाचे आहे. विशेषतः तरुण पिढीना आणि महिलांना या धावपळीच्या ताणतणावाचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर योगाचा अंगीकार करून शारीरिक व मानसिक आरोग्य जपावे,असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी अंतर योग फाउंडेशन ला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान अंतर योग फाउंडेशन उपक्रमांची माहिती घेतली तसेच फाउंडेशनद्वारे योग आणि मानसिक आरोग्यविषयक सुरू असलेल्या कार्याचे कौतुक केले. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, महिलांना आणि युवापिढीला योग व आध्यात्मिकतेच्या मार्गाकडे प्रवृत्त करून त्यांना मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. आजच्या काळात मानसिक आरोग्य ही महत्त्वाची बाब असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो असेही यावेळी सांगितले. यावेळी अंतर योग फाउंडेशनचे संस्थापक व अध्यात्मिक गुरु आचार्य उपेंद्रजी आणि अंतर योग फाउंडेशनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अतिक्रमण हटाव मोहिमेत बेरोजगारांच्या व्यवसायाचे रक्षण करावे

## लघु व्यवसाय समितीचे मेहकर नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : मेहकर शहरात नगरपरिषद प्रशासनाकडून चालू असलेल्या अतिक्रमण मोहीमेत लघू उद्योजक व बेरोजगारांचे व्यवसाय रक्षण करावे, त्यांच्या पोटापाण्याच्या व्यवसायावर गदा आणू नये, अशी मागणी लघू व्यवसाय समितीच्या वतीने मेहकर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून लघू उद्योजक व बेरोजगारांनी स्वतःची छोटी दुकाने, स्टॉल्स, गाळे व टपऱ्या उभारून व्यवसाय सुरु केले आहेत. अनेकजण नजुल जमिनीवर, सार्वजनिक ठिकाणी किंवा शासकीय जागेच्या कडेने व्यवसाय करत आहेत. ही कामे मुख्यतः गरिब, सुशिक्षित बेरोजगार आणि स्थानिक तरुणांनी रोजगार मिळवण्यासाठी सुरु केली आहेत.**



१९८४ साली शासनाने काही भागांमध्ये नजुल जमीन लघू उद्योजक व बेरोजगारांना उपलब्ध करून दिली होती. जसे जिजाऊ चौक ते बाबासाहेब आंबेडकर वटिकेच्या दरम्यानचा परिसर. अशाच प्रकारे शहरातील इतर ठिकाणी देखील अनेकांनी प्रामाणिकपणे व्यवसाय उभे केले आहेत. जे आज त्यांच्या कुटुंबाचे एकमेव उपजीविकेचे साधन आहेत.गेल्या काही काळात एमएसआरडीसी व इतर यंत्रणांमार्फत रस्ते, ड्रेनेज, फूटपाथ इत्यादींचे काम झाले असून, त्यानंतरही अनेक भागांत थोड्याशा जागेत हे व्यवसाय सुरू आहेत. मात्र, सध्या महापालिका प्रशासनाकडून ''अतिक्रमण मोहीम राबवली जात आहे आणि त्याद्वारे हे प्रामाणिक व्यवसाय हटवले जात आहेत. काही ठिकाणी दरवर्षी, निवडक ठिकाणीच कारवाई केली जाते, तर अनेक अतिक्रमण असलेल्या ठिकाणी दुर्लक्ष केले जाते. लवकरच काही जागा भाडेपट्टीने अधिकृत पद्धतीने देण्यात येणार आहेत, ज्या ठिकाणी लोक अनेक वर्षांपासून वास्तव करत आहेत किंवा व्यवसाय चालवत आहेत.त्यामुळे संपूर्ण मेहकर शहरातील लघू उद्योजकांचे व्यवसाय अतिक्रमण म्हणून पाहण्याऐवजी, त्यांना शासकीय धोरणांतर्गत भाडेपट्टीवर नियमित करण्याची कार्यवाही करण्यात यावी. ज्या ठिकाणी व्यवसाय सुरक्षीतपणे रस्त्यांच्या शिस्तीत राहून चालू आहेत, त्यांना कोणताही त्रास किंवा विस्थापन होऊ नये, नवीन धोरण राबविण्याच्या प्रक्रियेत स्थानिक लघू उद्योजक संघटनांना सल्लागार म्हणून समाविष्ट करावे, लघू उद्योजक, बेरोजगार युवक व महिला उद्योजिकांसाठी स्वतंत्र व्यवसाय झोन किंवा स्टॉल मार्केट विकसित करण्यात यावे.

शहराचा विकास अत्यावश्यक आहे, पण तो विकास या मेहनती लघु उद्योजकांचे संसार उद्ध्वस्त करून नव्हे, तर त्यांना संरक्षण व संधी देतच व्हावा. अशी मागणी मेहकर येथील लघू उद्योजक समिती च्या वतीने मेकर नगरपंचायत परिषदेचे अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी, मेहकर पोलीस स्टेशन यांना दिल्या आहेत.

### अतिक्रमण हटवून गोरगरिबांच्या तोंडचा घास काढू नका

मेहकर शहरांमध्ये गत तीन चार दिवसापासून मेहकर नगर परिषदेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू आहे.अतिक्रमण हटवून गोरगरीब लोकांच्या तोंडाचा घास काढू नका, त्यावर सुवर्णमध्य काढा, अशी विनंती आमदार सिद्धार्थ खरात यांनी जिल्हाधिकारी यांना केली. डोणगाव, जानेफळ हा एमएसआरटीसी अंतर्गतचा रोड आहे.तेथे सर्विस रोड टाकलेला आहे त्यावर अतिक्रमण काढणे सुरू आहे. यामध्येही सुवर्ण मध्ये काढा जानेफळ समृद्धी मार्गाला जोडणारा मार्गावर नाल्याचे बांधकाम केलेले आहे. त्यावरील अतिक्रमण काढा.मात्र, गोरगरीब जनतेची तोंडचा घास काढून विकास करू नका, गोरगरिबांचा रोजगार उध्वस्त करून विकास योग्य नाही. त्यामुळे त्यावर योग्य पर्याय काढा यामध्ये आपण विशेष लक्ष द्या अशी विनंती आमदार सिद्धार्थ खरात यांनी जिल्हाधिकारी यांना केली.

# संजय निरुपम विरोधात गुन्हा दाखल करा

## - उमरखेड येथील बौध्द - मुस्लिम युवकांची निवेदनाद्वारे मागणी - त्या वादग्रस्त वक्तव्याचा केला निषेध






दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** शिवसेना नेते संजय निरुपम यांनी काही दिवसांपूर्वी वक्फ बोर्ड सुधारणा कायद्याविरोधात जर कोणी आंदोलन केल्यास त्यांचा जालियनवाला बाघ करून त्यांच्यावर गोळ्या झाडू असे बेताल वक्तव्य केले आहे. याचा निषेध करण्यासाठी व त्यांच्या वर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी उमरखेड येथीलबौध्द मुस्लिम युवकांनी जिल्हाधिकारी यांना उपविभागीय अधिकारी मार्फत निवेदनाद्वारे केली आहे.

संजय निरुपम यांना कदाचित माहित नसेल की, स्वतंत्र संग्रामात जालीयनवाला बागात हजारो भारतीयांवर ब्रिटिश क्रूर सैन्य अधिकारी जनरल डायर ने बेछूट गोळीबार केला होता ज्यात हजारो भारतीय शहीद झाले होते. आज ही संजय निरुपम च्या रुपात जनरल डायर जिवंत असून अश्या लोकांविरुद्ध कायदेशीर कारवाई होणे महत्वाचे आहे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

भारतीय घटनेत प्रत्येक व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समूहाला शासनाच्या धोरणा विरोधात शांततेत आंदोलन, मोर्चा करण्याचा अधिकार दिला आहे. वक्फ बोर्ड अमेंडमेंट ॲक्ट जर काही लोकांना संविधान विरोधी वाटत असेल तर त्या विरोधात शाहीन बाग सारखे आंदोलन होत असेल तर यात काय चुकीचे? ते संविधानिक अधिकार आहे परंतु संजय निरुपम यांनी शाहीन बाग आंदोलन केल्यास तुमचा जालियनवाला बाग करू अशी खुली धमकी दिली आहे. ही एक प्रकारे चितावणी वजा धमकी असून संजय निरुपम विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी निवेदन द्वारे करण्यात आली आहे. यावेळी आदी उपस्थित होते.

मार्शल विनोद बरडे, संतोष जोगदंडे, शेख साजिद, मोसिन राज, देवानंद पाईकराव, शेख नदीम, हाजी इर्शाद, सचिन वाहुळे, मुक्तार शाह, शेख. फरीद, समीर खान, शाहरूख पठाण, विश्वनाथ शिंदे, अनवर खान, सय्यद इमरान, कुलदीप खडसे, शाहरुख खान, सय्यद शहेबाज, शेख इम्रान, शेख मुक्तार आदीं उपस्थित होते.



### २६ तलावाच्या मासेमारी ठेक्यासाठी निविदा आमंत्रित

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहिर केले आहे. त्यानुसार सन २०२५-२६ वर्षाकरिता, बुलढाणा जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील २६ तलाव निर्धारित कार्यक्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासन निर्णय, अटी व शर्तीचे अधिन जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीचे मान्यतेने तलाव मासेमारी ठेक्याने देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील २६ तलाव पळसखेड भट ३० हेक्टर, मातला २७ हे., कव्हळ ४१ हे., चांदई/गोद्री ३५ हे., ब्राम्हणवाडा ९६ हे., हराळखेड ४२ हे., चायगांव २३ हे., पळशी बोरी ५७ हे., कळपविहीर ३३ हे., पिंपळगांव चिलमखाँ २८ हे., शिवणी आरमाळ ८५ हे., तांदूळवाडी ३५ हे., निमगांव वायाळ १० हे., चोरपांग्रा ३६ हे., धामणगांव बढे ३५ हे., गणेशपूर २२ हे., हिवरखेड क्र. १२० हे., लांजुड ३६ हे., पिंपरखेड २९ हे., कंडारी ४० हे., पलढग ११९ हे., नेतन्सा ११९ हे., बोराखेडी १४४ हे., ढोरपगांव १०५ हे., निम्नज्ञानगंगा- १७१ हे., दुर्गबोरी १४ हेक्टर या तलावांची मुदत दि. ३० जून २०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सन २०२५-२६ वर्षाचे तलाव ठेका प्रक्रियाकरिता नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासन निर्णय अटी व शर्तीचे अधिन जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीचे मान्यतेने तलाव मासेमारी ठेक्याने देण्याचे प्रस्तावित आहे.

शासन निर्णय कृषी व पदुम विभाग दि. ३ जुलै २०१९ मधील तरतूदी व अटी शर्तीनुसार बुलढाणा जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाचे तलाव ठेका मुदत संपुष्टात आलेले तलाव नव्याने मासेमारी ठेक्याने देण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. याबाबत सविस्तर तपशील शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा कार्यालयाचे नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां), बुलढाणा कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

# सहज प्रणाली: महसुल दस्तऐवज, एका क्लिकवर

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक जुने महसुली अभिलेख, प्रमाणपत्रासाठी वारंवार महसूल कार्यालयाला भेटी देत असतात. यामुळे नागरिकांचा वेळ व अनेक अडचणीला सामोर जावे लागत होते. परंतु आता सहज प्रणालीच्या माध्यमातून महसुल दस्तऐजव एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. या प्रणालीचा सर्व नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जुने महसुली अभिलेख जसे जुने नकाशे, भुसंपादन निवाडा प्रत, अकृषक आदेश, इनाम जमीन वाटप रजिस्टर, जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर, लवाद आदेश, नझुल प्रकरणे, प्रमाणित प्रत, नक्कल अशा विविध महसूल दस्तावेजासाठी नागरिक अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालयात भेट देत असतात. तथापि जुने महसुली अभिलेख शोधणे ही एक वेळ खाऊ आणि क्लिष्ट प्रक्रिया होती. तसेच जुने दस्ताऐवज जीर्ण झाल्याने उपलब्ध होण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे नागरिकांना सुलभपणे नक्कल मिळवण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता.

या समस्येवर मात करणेसाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतुन जिल्हा महसुल प्रशासनांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल शाखा, भुसंपादन शाखा, पुनर्वसन शाखा, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, तसेच सर्व तहसिलदार कार्यालय येथील जुने महसुली अभिलेख जतन करण्यासाठी व नागरिकांना सुलभ रितीने अभिलेख उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून अभिलेखाचे संगणकीकरण हा नाविन्यपूर्ण उपक्रम दि. १ ऑगस्ट २०२४ या महसुल दिनांपासुन राबविण्यात आला. त्यानुसार जिल्हा महसुल प्रशासनाने एक सॉफ्टवेअर विकसित केले असून नागरिकांना आवश्यक दस्ताऐवज सदर प्रणालीव्दारे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रणालीमध्ये प्रकरणाचे वर्ष, पक्षकाराचे नाव, तालुका, गाव, निवाडा क्र.गट क्र. ईत्यादी तपशीलाव्दारे शोधता येईल. सदर प्रणालीला सहज प्रणाली नाव देण्यात आले असुन त्याचे लोकार्पण न्यायमुर्ती अनिल स. किलोर यांचे हस्ते दि. २३ मार्च २०२५ रोजी करण्यात आले आहेत.

सदर प्रणालीव्दारे शेतकरी व नागरिकांना आवश्यक असणारे दस्तऐवज, जुने महसुली अभिलेख निःशुल्क पाहता येणार असुन आवश्यक दस्तऐवजाची प्रमाणित प्रत विहीत शुल्क ऑनलाइन प्रणालीव्दारे भरुन जिल्हाधिकारी कार्यालय येथील अभिलेख कक्ष व तहसिलदार कार्यालयातील अभिलेख कक्षातुन सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करुन घेता येणार आहे.


### सहज प्रणालीचे फायदे

जमीन दस्ताऐवजांची विनाविलंब उपलब्धता, नागरिकांच्या वेळेची व पैशाची बचत, एआयचा वापर असल्याने कामकाजात सुलभता, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासन, शेतकऱ्यांना न्यायालयीन व अर्ध न्यायिक प्रकरणांमध्ये मदत, विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यास सुलभता, महसुली प्रशासनातील कार्यक्षमतेत गतीमानता, अभिलेख्यांचे कायम स्वरुपी जतन.

## विविध वृत्त...

### अमरावती शहरात रिल्स स्टारचा धुमाकूळ; भर रस्त्यात रिल्ससाठी बनवला व्हिडिओ





दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** रिल्स बनवून तो व्हिडिओ सोशल मीडियावर टाकण्याचा सर्वांनाच मोह असतो. मात्र, हे सगळं करताना कोणाला त्रास होणार नाही व स्वतःचा जीव देखील धोक्यात जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. अमरावती शहरात काल दुपारी भर उन्हात देविदास इंगोले या व्यक्तीने अमरावती शहरातील पंचवटी व राजकमल चौकात दोन रिल्सस्टारचा धुमाकूळ बघायला मिळाला. भर रस्त्यात रिल्ससाठी व्हिडिओ बनवला. यावेळी दोन्ही बाजूने ट्राफिक लागलं असताना दोन रिल्सस्टार मात्र बेधडकपणे खुलेआम नाचत होते. यावेळी त्यांच्या जवळून गाड्या जात होत्या तरी देखील ते दोघे हटले नाही. लाईकच्या नादात जीव धोक्यात घालणे योग्य आहे का? या घटनेची दखल पोलिसांनी देखील घेतली आहे.

अमरावती शहराच्या पंचवटी चौकामध्ये हा ऐन वाहतुकीच्या वेळेस तो काढलेला व्हिडिओ आहे. दोघांनाही स्पष्टीकरणासाठी पोलिस ठाण्यात बोलावले आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त कल्पना बारवकर यांनी दिली. या प्रकरणात इंगोले याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील कारवाई पोलिस करत आहेत.

### महावीर जयंतीला कत्तलखाने, मांसविक्री बंद

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात गुरुवार, दि. १० एप्रिल रोजी महावीर जयंती तसेच शनिवार दि. १२ एप्रिल रोजी हनुमान जयंती साजरी करण्यात येणार आहे. जयंतीनिमित्ताने कत्तलखाने आणि मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याचे आदेश अपर जिल्हाधिकारी यांनी दिले आहे. निर्बंधाच्या कालावधीत मांसविक्री होणार नाही, याची दक्षता देण्याचे निर्देशही देण्यात आले आहे.

जैन धर्मियांच्या वतीने महावीर जयंती तसेच हनुमान जयंतीनिमित्त उत्सव मिरवणूक काढण्यात येतात. सध्या विविध राजकीय पक्ष संघटनांकडून सुरु असलेली आंदोलने, औरंगजेबाची कबर काढण्याच्या कारणावरुन नागपूर येथे उद्भवलेली जातीय दंगलीची पार्श्वभूमी, राज्यातील राजकीय घडामोडी व त्यांच्याकडून विविध मागण्या संदर्भात होणारे आंदोलने, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमी, तसेच उत्सवाचा मागील इतिहास लक्षात घेता या उत्सव काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी दक्षता बाळगणे आणि खबरदारीच्या उपाययोजना अंमलात आणून चोख बंदोबस्त नेमणे आवश्यक असल्याने उत्सवाचे काळात दि. १० एप्रिल २०२५ रोजी श्री महावीर जयंती उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी, यासाठी कत्तलखाने आणि मांस विक्री दुकाने बंद ठेवावीत. तसेच कोणत्याही परिस्थितीत मांसविक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आदेशात नमूद केले आहे.

### भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण; १५०० हून अधिक विद्यार्थ्यांचा भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषामध्ये सहभागी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त उत्सव समिती तर्फे भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाले. त्या निमित्ताने आज बुलढाणा शहरातील बहुतांश शाळांमध्ये १५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित सामूहिक प्रश्न मंजुषेच्या स्पर्धेत सहभाग घेतला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रथमच या प्रश्न मंजुषा चे आयोजन शहरात करण्यात आले होते. संविधानाची मूल्ये व संविधानाबाबत जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने समितीच्या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे.

# सर्वसामान्यच नव्हे तर चक्क आमदार, केंद्रीय मंत्र्यांची सुद्धा अधिकाऱ्यांकडून दिशाभूल

## दीड कोटीची योजना अर्धवट असताना भर सभेत दिली पूर्ण झाल्याची माहिती



वरुड येथील जलजीवन मिशन योजनेच्या स्विच रूमचे काम अर्धवट..!

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : वर्षानुवर्षांपासून पाण्यासाठी होत असलेली पायपीट कायमस्वरूपी थांबावी, मायमाऊल्यांच्या डोक्यावरील हंडा खाली उतरावा, गावात शुद्ध मुबलक पाणी मिळावे, या उदात्त हेतुने तब्बल एक कोटी ५३ लाख रुपयांचा निधी मंजूर करून तालुक्यातील वरुड येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात आले. सदर काम अर्धवट असताना मेहकर उपविभागाचे विभागीय अभियंता यांनी चक्क आमदार सिद्धार्थ खरात व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत झालेल्या आम सभेतच खोटी माहिती देत जल जीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाल्याचे सांगितले. त्यानंतर आपला विदर्भच्या टीमने गावात जाऊन वास्तव परिस्थिती जाणून घेतली असता मोठे गौडबंगाल उघड झाले. चक्क आमदार व केंद्रीय मंत्र्यांना खोटी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यावर आता काय कारवाई होणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.**

तालुक्यातील वरुड गावात तब्बल एक कोटी ५३ लाख रुपये याचा निधी मंजूर करून जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात आले. सदर काम अर्धवट असताना मेहकर उपविभागाचे उपविभागीय अभियंता यांनी २९ मार्च रोजी आमदार सिद्धार्थ खरात व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यासह इतर अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित आमसभेत मेहकर तालुक्यातील बटाळा, बाभुळखेड, कामखेड, मोहदरी व वरुड या सहा गावातील जल जीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाल्याची माहिती भर आमसभेत देऊन आमदार व मंत्र्याची दिशाभूल केली. त्यानंतर आपला विदर्भाने वास्तव परिस्थिती जाणून घेण्यासाठी वरुड गावात जाऊन वास्तव परिस्थिती जाणून घेतली असता त्यामध्ये भलतेच गौडबंगाल उघड झाले. गावात पाण्याचा थेंबही नसताना अधिकाऱ्यांनी जल जीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाल्याचे माहिती दिली. तर गावातली नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या असता गावात पिण्याचे तर, सोडा साधे वापरायचे सुद्धा पाणी नाही. दोन-दोन किलोमीटर अंतरावरून सर्व कामधंदे सोडून पाणी आणावे लागत आहे. अशी प्रतिक्रिया दिली.यावरून वरुड येथील तब्बल दीड कोटी रुपयांच्या जलजीवन मिशन कामांमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही जनतेने केला आहे. तर, वास्तव परिस्थितीवरून हा प्रकारही उघडकीस आला आहे. गावात पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीचे काम अर्धवट असताना अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्याची माहिती भर आम सभेत दिल्याने अधिकाऱ्यांची मुजोरी किती वाढली याचा प्रत्यय यावरून दिसून येत आहे. अधिकारी आमदार सिद्धार्थ खरात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत झालेल्या आमसभेत खोटी माहिती देऊन अधिकारी पदाधिकाऱ्यांची दिशाभूल करतात तर सामान्य नागरिकांचे काय स्थिती असेल याची कल्पनाही न केलेली बरी अशी वास्तव स्थिती वरुड गावात दिसून येत आहे. या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून गावात पाणीपुरवठा करावा, अशी रास्त अपेक्षा वरुड गावातील जनतेने व्यक्त केली आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक



वरुड येथील जल जिवन मिशनच्या पाण्याच्या टाकीचे काम अर्धवट...!

### गावात पाणीच नाही




गावात दीड कोटी रुपये खर्च करून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात आले असले तरी, गावात पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाणीच मिळत नाही. असा आर्त टाहो ग्रामस्थांनी फोडला. त्याचबरोबर महिलांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता महिलांनी संबंधित अधिकाऱ्याबद्दल तीव्र रोष व्यक्त करीत पाणीपुरवठा योजनेचे काम अर्धवट असताना आमदार- खासदारांना तथा मंत्र्यांना खोटी माहिती देऊन दिशाभूल केली सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करण्याबरोबरच अधिकाऱ्यांची मुजोरी आता आमदार केंद्रीय मंत्र्यांपरत पोचली आहे. अधिकारी भर आमसभेत खोटी माहिती देतात तर सामान्य जनतेची काय स्थिती असेल याची कल्पनाही न केलेली बरी. गावातील मायमाऊल्या दोन दोन किलोमीटर अंतरावरून सर्व कामधंदे सोडून पाणी आणतात गावात एक वेळ धरणातील पाणी सोडले असता नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास झाला. आजारी वाढलेत. लोकांना त्वचेचा आजार झाला. त्यामुळे सदर काम पाणी बंद करण्यात आले त्यानंतर आता पाणीपुरवठा सुद्धा केला गेला नाही याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन खोटी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे व गावात पाण्याची सुविधा करावी, अशी मागणी ग्रामपंचायतच्या महिला सदस्यांनी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर गावातील किती कामे झाली आणि काय कामे झाली याबद्दल सुद्धा कोणतीही माहिती नसल्याचेही त्यांनी आपला विदर्भाला बोलताना दिली आहे.

## तळोद्याच्या गुंडाची दोंडाईचात दहशत; बंदुकीच्या धाकाने ट्रक चालकाची लूट

दैनिक आपला विदर्भ







**धुळे/प्रतिनिधी :** ट्रकच्या पुढे दुचाकी अडवून कॅबिनमध्ये घुसून चालकाला बंदुकीसह चाकूचा धाक दाखवून, ट्रॅक चालका कडील मोबाईलसह ४ हजाराची रोकड आणि मोबाईल बळजबरीने हिसकावून घेण्याल आला. ही घटना दोंडाईचा जवळ टाकरखेडा शिवारात काल रात्री घडली, लुट करणाऱ्यांपैकी एक तळोदा तालुक्यातील असून तिघे अनोळखी आहेत. दोंडाईचा येथील डालडा घरकूल येथे राहणारा ट्रक चालक मुक्तार शाह यांनी फिर्याद दाखल केली आहे. दोंडाईचा टाकरखेडा गावाच्या अलिकडे दुचाकी वर चार जण काल रात्री अंधारात लपून बसलेले होते, समोरून ट्रक येताच ट्रकच्या पुढे दुचाकी लावून ट्रक अडविण्यात आला. ट्रक थांबताच तिघे ट्रकच्या कैबिनमध्ये घुसले आणि बंदुक, चाकू, सुरीचा धाक ट्रक चालकाला दाखवित त्याच्याकडील रोकड यावेळी लुटण्यात आली. दरम्यान पोलिसांनी आपली तपासाची चक्र फिरवली असता, एका संशयिताला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे. त्याच्याकडून पिस्टल आणि दोन राऊंड जप्त करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस करीत आहे.

## नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दिलीप भुजबळ वर्धा दौऱ्यावर

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवस कृति प्रारुप अभियान अंतर्गत पुलिस विभागात देखील गुन्हेगारी संदर्भातील जुने गुन्हे व चालू प्रकरणांना वेळेत निकाली काढण्याच्या अनुषंगाने तसेच विभागातील क्षेत्रिय पोलीस ठाण्यात महिलांकरीता अभ्यांगत कक्ष स्थापन ठाण्याअंतर्गत महिलांसदर्भात तक्रारी प्राप्त होतात. याकरीता ठाण्यात अभ्यांगत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. महिलांना सुविधा व्हावी याकरीता महिला हेल्प डेस्क सुविधा करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त पुलिस काका, पुलिस दीदी सुविधा उपलब्ध आहे. महिलांच्या तक्रारींवर वेळेत कार्यवाही करण्यात येत आहे.



शासनाने दिलेल्या १०० दिवस कृति प्रारुप अभियाना अंतर्गत गुन्हेगारी प्रकरणांना निकाली काढण्याचा प्रयत्न आहे. तक्रारदारांची समस्या वेळेत निकाली निघावी व जन सामान्यांना न्याय मिळावा, हाच यामागील आमचा उद्देश्य असल्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परीक्षेत्र नागपूर दिलीप भुजबळ यांनी सांगितले. ते आज वार्षिक निरीक्षण संबंधाने वर्ध्याच्या दौऱ्यावर होते.

## पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांचेकडून कै. कैलास नागरे कुटुंबाचे सांत्वन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी आज शिवणी आरमाळ (ता. देऊळगाव राजा) येथील कै.कैलास नागरे यांच्या यांच्या परिवारास सांत्वनपर भेट दिली.

राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कारप्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी २४ मार्च रोजी आत्महत्या केली होती. आज पालकमंत्री ना. पाटील यांनी त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. कुटुंबियांचे सांत्वन केले. राज्य शासनाने या कुटुंबाचे पालकत्व घेतले असून पालकमंत्री म्हणून सर्व जबाबदारी पार पाडेल, अशी ग्वाही ना. पाटील यांनी यावेळी दिले.



राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कारप्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी आत्महत्या केली होती. या घटनेची राज्य शासनाने गंभीर दखल घेत खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी धोत्रा नंदई व इतर १४ गावांना बंदिस्त पाईपलाईनद्वारे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला असून या गावांना खडकपूर्णाचे १६६० हे सिंचन क्षेत्रासाठीचे पाणी देण्याचा ७० कोटींचा प्रस्ताव नियामक मंडळाकडे पाठविण्यात आला आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आली आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांच्याशी चर्चा केली आहे. लवकरच या प्रस्तावाला मान्यता मिळवून १४ गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्नशील असून कै. कैलास नागरे यांचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली असल्याचे पालकमंत्री ना.पाटील यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार मनोज कायंदे, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, सरपंच कांताबाई सोनपसारे, उपसरपंच संध्या अरसाळ तसेच अन्य अधिकारी,ग्रामस्थ उपस्थित होते.